RNI No.MAHBIL/2009/37831

Reg. No. MH/MR/South-339/2011-13

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

# असाधारण भाग चार—ब

वर्ष ३, अंक ९३] सोमवार, नोव्हेंबर २१, २०११/कार्तिक ३०, शके १९३३ [पृष्ठे ४

किंमत : रुपये १२.००

असाधारण क्रमांक १६५

## प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

ग्रामविकास व जलसंधारण विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २१ नोव्हेंबर २०११

### अधिसूचना

**मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८.**

क्रमांक व्हीपीएम.२६०९/प्र.क्र. १०६/पंरा-४(२२).—मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ (सन १९५९ चा मुंबई ३) याच्या कलम १७६, पोट-कलम (२) चा खंड (सव्वीस) अन्वये महाराष्ट्र शासनास प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा व त्या बाबतीत महाराष्ट्र शासनास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासनाने याद्वारे महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व फी नियम, १९६० यात आणखी सुधारणा करण्यासाठी पुढील नियम करीत आहेत. हे नियम उक्त कलम १७६ पोट कलम ४ द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे यापूर्वी प्रसिद्ध करण्यात आले होते :—

१. या नियमांना, महाराष्ट्र ग्रामपंचायात कर व फी (सुधारणा) नियम, २०११ असे म्हणावे.

२. महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व फी नियम, १९६० (यात यापुढे ज्याचा निर्देश " मुख्य नियम " असा करण्यात आला आहे.) याचा नियम ६ मधील खंड (क) मध्ये, उप-खंड (पाच) नंतर, पुढील उप-खंड जादा दाखल करण्यात येईल :—



Scanned by CamScanner

“ (सहा) पवनचक्कीकरिता आवश्यक असलेल्या मनो-यांचे तळधर क्षेत्र, दळणवळणाकरिता मनोरे आणि इतर प्रयोजनांकरिता वापरण्यात येणारे मनोरे आणि त्यांची कार्ये पार पाडण्याकरिता आवश्यक असलेल्या खुल्या जागा. ”

३. मुख्य नियमांच्या भाग दोन मधील अनुसूची मध्ये, तक्त्यामधील स्पष्टीकरण (आठ) नंतर, पुढील तक्ता जादा दाखल करण्यात येईल.—

“ तीन. मनो-यावरील कराचा दर

| अनुक्रमांक | मनो-यांचे भाग | | ग्रामपंचायतीचा प्रकार | किमान दर (रुपये) | कमाल दर (रुपये) |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | | (३) | (४) | (५) |
| १ | मनो-याचे तळधर (प्रती चौरस फूट) | | ग्रामपंचायतीचा कोणताही प्रकार | ३ | ८ |
| २ | खुली जागा (प्रती १०० चौरस फूट). | (क) | सर्वसाधारण किंवा डोंगराळ आदिवासी क्षेत्र असलेल्या ग्रामपंचायती. | ०.२० | ०.४० |
| | | (ख) | महानगरपालिका किंवा नगरपालिका यांच्या लगतच्या सर्व ग्रामपंचायती | ०.४० | ०.८० |

**स्पष्टीकरण.**—अनुक्रमांक १ मध्ये नमूद केलेल्या पवनचक्की मनो-यावर कर बसविण्याच्या प्रयोजनाकरिता, एका पवनचक्की मनो-याकरिता कराची कमाल रक्कम ही रुपये १५,००० प्रति मेगावॅटपेक्षा अधिक असणार नाही.

**कर बसविण्याकरिता अटी व शर्ती.**—

(एक) पवनचक्कीकरिता आणि इतर प्रयोजनांकरिता वापरण्यात येणा-या मनो-याचे काम पूर्ण झाल्यानंतर कर बसविण्यात येईल.

(दोन) पवनचक्कीचे मनोरे आणि इतर मनोरे बंद असतील किंवा वापरात नसतील तरी कर बसविण्यात येईल.

(तीन) मनो-याच्या तळाघराचे क्षेत्र मोजताना केवळ मनो याची लांबी आणि रुंदी विचारात घेण्यात येईल आणि मनो-याची उंची विचारात घेण्यात येणार नाही."

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी,**

शासनाचे उप सचिव.

Scanned by CamScanner

## RURAL DEVELOPMENT AND WATER CONSERVATION DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 21st November 2011

*NOTIFICATION*

BOMBAY VILLAGE PANCHAYAT ACT, 1958.

No. VPM.2609/CR-106/PR-4(22).— In exercise of the powers conferred by clause (*xxvi*) of sub-section (2) of section 176 of the Bombay Village Panchayats Act, 1958 (Bom. III of 1959), and of all other powers enabling it in this behalf, the Government of Maharashtra hereby makes the following rules further to amend (excess Amendments, in) the Maharashtra Village Panchayat's Taxes and Fees Rules, 1960, the same having been previously published as required by sub-section (*4*) of the said section 176, as follows, namely :—

1. These rules may be called the Maharashtra Village Panchayats Taxes and Fees (Amendment) Rules, 2011.

2. In rule 6 of the Maharashtra Village Panchayats Taxes and Fees Rules, 1960 (hereinafter referred to as " the principal Rules "), in clause (*c*), after sub-clause (*v*), the following clause shall be added, namely :—

"(*vi*) basement area of towers required for windmills, towers for communication and towers used for other purposes and open spaces required for its functioning. "

3. In part II of the principal Rules, in the Schedule, after Explanation clause (*viii*) of the following shall be added, namely :—

" III. Rate of Tax on Towers

| Sr. No. (1) | Part of Towers (2) | Types of Grampanchayat (3) | Minimum rate (Rs.) (4) | Maximum rate (Rs.) (5) |
|---|---|---|---|---|
| 1 | Basement of Tower (per. Sq.ft.) | Any type of Grampanchayat. | 3 | 8 |
| 2 | Open space (per 100 Sq.ft.) | (*a*) General or Hilly Aadivasi Area Grampanchayats. | 0.20 | 0.40 |
| | | (*b*) All Grampanchayats abutting Municipal Corporation or Municipalities. | 0.40 | 0.80 |

Scanned by CamScanner

**Explanation :—**

For the purposes of levy of tax on windmill tower mentioned in serial No.1, the maximum amount of tax for one Windmill tower shall not be more than Rs. 15000 per megawatt.

**Terms and conditions for levy of tax.—**

(*i*) Tax shall be levied after completion of work of the towers used for windmills and other purposes.

(*ii*) Tax shall be levied although the towers of the windmills and other towers are closed or not in use.

(*iii*) For calculating the area of basement of the towers, the only length and width of tower shall be taken into consideration and not height of the tower."

By order and in the name of the Governor of Maharashtra,

DR. MALLINATH KALSHETTI,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI

Scanned by CamScanner